# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे "विशेष अपील निर्गत कार्यक्रम" दि.२१.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.सुनिल सिताराम सुबंध,<br>मु.पो.वडगाव निबांळकर,<br>ता.बारामती, जि.पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | विस्तार अधिकारी (सांख्यिकी),<br>पंचायत समिती कार्यालय,<br>ता. बारामती, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती बारामती, जि.पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री.सुनिल सिताराम सुबंध, मु.पो.वडगाव निबांळकर, ता.बारामती, जि.पुणे यांनी दि.०७.०५.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी), पंचायत समिती कार्यालय, बारामती, जि.पुणे यांचेकडे बारामती तालुक्यातील ग्रा.पं.निहाय दारिद्र्य रेषेतील लाभार्थ्यांची यादी, अंत्योदय योजनेचे लाभार्थी यादी व ठराव याबाबत माहिती मागितली होती.

माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत श्री.सुबंध यांनी दि.२२.१०.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : १८।११।२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बबन धोंडिबा वाघमारे
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, बिल्डिंग एम/४४/२५६९,
येरवडा, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ शहर मंडळ,
रास्ता पेठ, पुणे-११ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ शहर मंडळ,
रास्ता पेठ, पुणे-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५० / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बबन धोंडिबा वाघमारे
महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, बिल्डिंग एम/४४/२५६९,
येरवडा, पुणे-४११००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ शहर मंडळ,
रास्ता पेठ, पुणे-११ प्रतिनिधी श्री.पद्माकर राजाराम जोशी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
रास्ता पेठ शहर मंडळ, रास्ता पेठ, पुणे-११ श्री.दिपक सबाजी लहामये

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्रीमती लक्ष्मीबाई एस.चाटोरकर यांना अनावश्यक आणि नियमबाह्य क्रेडिट दिलेले आहे. हा मामला महसूल चोरीचा व मंडळाच्या आर्थिक नुकसानीचा आहे याबाबत, महसूल वसुलीबाबत कारवाई केलेली आहे काय?, नसेल तर का केली नाही, सदर ग्राहकाचा मीटर अचानक बदलण्यात आला त्याचे कारण काय, मीटर चेंज रिपोर्ट द्यावा, दोनदा क्रेडिट दिलेली बी-८० रिपोर्ट टिपणीसह द्यावेत. | |

## विवेचन

वीज मंडळाच्या महसूल चोरीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.बबन धोंडिबा वाघमारे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, रास्ता पेठ शहर मंडळ, रास्ता पेठ, पुणे-११ यांच्याकडे मागितली होती. ती विहित मुदतीत मिळाली नाही, म्हणून प्रथम अपील न करता श्री.वाघमारे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.वाघमारे यांनी मागितलेल्या माहितीचा तपशील वेगवेगळ्या कार्यालयांशी संबंधित असल्यामुळे विविध कार्यालयांमध्ये त्यांच्या अर्जाचा प्रवास झाला. तसेच दरम्यानच्या काळात संबंधित अधिका-यांच्याही बदल्या झाल्या, त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. मात्र माहिती देण्यात आल आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक सबाजी लहामये व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.पद्माकर राजाराम जोशी यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

दि.१९.३.२००८ रोजी झालेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी व अपीलकर्ता यांच्यामध्ये झालेल्या चर्चेनुसार एक महिन्याच्या मुदतीत विषय निकाली काढण्याचा निर्णय झाला. परंतु त्यानुसार पूर्तता झाली नाही, असे प्रतिपादन श्री.वाघमारे यांनी आयोगापुढील सुनावणीच्या वेळी केले.

श्री.वाघमारे यांचा मुख्य मुद्दा महसूल चोरी झाली असल्याचा व त्याबातच्या कारवाईचा आहे. महसुलाचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे कारवाईचा मुद्दा येत नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे आहे, असे असले 'तरी संबंधित मीटर का बदलले, मीटर बदलण्याच्या अहवालावर वीजभार का दाखविण्यात आला नाही, हा अहवाल अपुरा संदिग्ध व दिशाभूल करणारा आहे. ग्राहकाला ४२४८ रुपयाचे क्रेडिट दिले आहे, त्यावरील टिपणी अपुरी व संशयास्पद आहे,' अशा स्वरुपाचे मुद्दे श्री.वाघमारे यांनी लेखी स्वरुपात उपस्थित केले. त्यांच्या शंकाचे निरसन करण्यासाठी आपण पत्र पाठविले होते, परंतु ते आले नाहीत, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या वतीने श्री.पद्माकर राजाराम जोशी यांनी सांगितले. आपल्याला पत्र मिळाले, परंतु त्यावर शिक्का नसल्यामुळे आपण गेलो नाही, असे श्री.वाघमारे यांनी सांगितले. या अनुषंगाने दि.२६.५.२००८ रोजी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी एकत्रित चर्चा करुन त्यानंतर आठ दिवसात आयोगाला अहवाल सादर करावा, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) दि.२६.५.२००८ च्या बैठकीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अद्याप का सादर केला नाही याबाबतच्या खुलाशासह आठ दिवसात आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.११.२००८
नोव्हेंबर-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २१.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ~~१५४२~~ ९५८२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ.मनोजकुमार मोतीचंद गांधी<br>२०२, गणेश अपार्टमेंटस्, २४/३, एरंडवणे,<br>कर्वे रोड, पुणे-४११ ००४ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती<br>जि. पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती<br>जि. पुणे | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. मनोजकुमार मोतीचंद गांधी यांनी दि. २७.७.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती यांचेकडे माहिती अधिकार कायद्यान्वये अपीलकर्त्याच्या चौकशी संबंधात नव्याने नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी यांचे संदर्भात माहिती मागितली होती.

अपील मागे घेत असल्याने सदर अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्ता श्री. गांधी यांनी दि. २०.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २८.११.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अरुण श्रीपती भालेराव
प्लॉट नं.ए/१/२, आर.के.पूरम,
मुंजाबा वस्ती, टिंगरेनगर, धानोरी, पुणे-१५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक,
येरवडा कारागृह मुद्रणालय,पुणे-६ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपीक,
येरवडा कारागृह मुद्रणालय,पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९+१६८+१३० / पुणे/२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरुण श्रीपती भालेराव
प्लॉट नं.ए/१/२, आर.के.पूरम,
मुंजाबा वस्ती, टिंगरेनगर, धानोरी, पुणे-१५

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपीक,
येरवडा कारागृह मुद्रणालय,पुणे-६ श्री.अशोक यादवराव दुधगावकर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या निर्णयाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १६९ | २८.६.२००६ | २२.७.२००६ | | १.९.२००६ |
| १६८ | ८.७.२००६ | १९.७.२००६ | | ३०.८.२००६ |
| १३० | २८.६.२००६ | २२.७.२००६ | | १०.८.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>**अ.क्र.१६९+१३०**-श्री.किशोर सर्जेराव वाईकर यांची अर्जात उल्लेख केलेली अकरा दिवसांची विशेष कार्यकर्ता रजा कोणत्या नियमाखाली मंजूर केली व त्यांनी रजा भरली नसल्यास त्यांना त्या दिवसाचे वेतन कोणत्या नियमानुसार दिले. खाजगी सहलीच्या पूर्वतयारीसाठी विशेष रजा देण्याचा नियम उपलब्ध आहे का, नसल्यास त्या दिवसांचे वेतन कपात करणार का?<br>**अ.क्र.१६८**-श्री.उघडे यांच्या संदर्भातील उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये ॲपिलेट ॲथॉरिटी स्थापनेचा उल्लेख नसताना संचालनालयामार्फत ॲपिलेट ॲथॉरिटी स्थापन करण्यात आली किंवा कसे, संचालनालयाने घेतलेले निर्णय कोणत्या आधारे घेतले, संचालनालयाने शासनाकडून मार्गदर्शन घेण्यासाठी वीस महिने विलंब लागला त्याची माहिती, कार्यालयाने चार्जशिटप्रमाणे कारवाई का केली नाही याची माहिती, श्री.उघडे यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे किंवा कसे याची माहिती. | | | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अरुण श्रीपती भालेराव यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे यांनी विहित मुदतीत न दिल्याच्या व दिलेली माहिती अपुरी असल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपीले केली आहेत.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश करण्यात आला होता. परंतु त्यावेळी तीनही घटकांमध्ये एकमत न झाल्यामुळे दि.२१.५.२००८ रोजी अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे येथील जन माहिती अधिकारी सातत्याने आपल्याला माहिती देत नाहीत व दिली तर ती खोटी, अपूर्ण व दिशाभूल करणारी देतात, असा आक्षेप श्री.भालेराव यांनी श्री.ह.ग.भारती, जन माहिती अधिकारी, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई व प्रामुख्याने

श्री.अ.या.दुधगावकर, जन माहिती अधिकारी, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे यांच्याविरुध्द सर्व कागदपत्रांमध्ये नोंदविले आहेत.

उपरोक्त अपिलांमधील अपील क्र.१३० हे राज्य मुख्य माहिती आयुक्त, डॉ.सुरेश जोशी यांनी दि.२९ सप्टेंबर २००७ रोजी निकाली काढलेले आहे. अपील क्र.१६९ मधील मागणीही तीच आहे. या अपिलांची पुन्हा दखल घेण्याची गरज नाही.

दिलेल्या माहितीच्या प्रतीही त्यांनी सादर केल्या. अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे व आयोगाकडे केलेल्या अपिलांमध्येही श्री.भालेराव यांनी मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त उपप्रश्न विचारुन माहिती मागितली आहे असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एस.के.आढाव यांनी लेखी व तोंडी नमूद केले. त्यासाठी पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. तसेच श्री.भालेराव यांना इतर माहिती देण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले. झालेल्या विलंबाची कारणे त्यांनी लेखी व तोंडी नमूद केली.

आपण वेळोवेळी माहिती दिली आहे, तसेच नंतरच्या काळात अपिलीय प्राधिकारी म्हणून आपलीच नियुक्ती झाल्याने अपिलाची सुनावणी आपण घेऊ शकत नसल्याचे, अपीलकर्त्याला कळविले, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दुधगावकर यांनी म्हटले आहे. ते रास्त आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेला पत्रव्यवहार पाहता या अपिलांमध्ये व्यापक सार्वजनिक हितापेक्षा वैयक्तिक संदर्भ अधिक असल्याचे स्पष्ट होते. माहितीच्या अधिकाराचा अशा प्रकारचा वापर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित नाही, याची जाणीव अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

तीनही अपिले निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१४.११.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत सोनू जगताप
बी-२ /४०२, अनुसूया एन्क्लेव्ह (बी),
वानवडी, पुणे-४११०४० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी
तथा सक्षम प्राधिकारी,
पुणे नागरी समूह, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी
तथा सक्षम प्राधिकारी क्र.२,
पुणे नागरी समूह, पुणे उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७ / अपील / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शशिकांत सोनू जगताप
बी-२ /४०२, अनुसूया एन्क्लेव्ह (बी),
वानवडी, पुणे-४११०४०

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी,
पुणे नागरी समूह, पुणे श्री.आर.के.गायकवाड

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, पुणे नागरी समूह, पुणे श्री.शंकरराव जाधव | | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३.६.२००६ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

स.नं.२१४ भोसरी यूएलसी केस नं.१३२ जे.ए.५४९ ते ५५३ व त्याबरोबरची दहा कागदपत्रे.

## विवेचन

नागरी जमीन कमाल धारणा मर्यादा कायद्याच्या अनुषंगाने १० कागदपत्रांची मागणी अपीलकर्ता श्री.शशिकांत सोनू जगताप यांनी जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, पुणे नागरी समूह, पुणे यांच्याकडे केली होती. कोणतीही माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.जगताप यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह यांच्याकडे अपील केले. परंतु त्यानंतरही कागदपत्रे न मिळाल्यामुळे श्री.जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित प्रकरणातील कागदपत्रे पाहण्यासाठी श्री.जगताप यांना कळविले होते परंतु संबंधित संचिका गहाळ झाली असल्यामुळे माहिती देणे शक्य झाले नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री.शंकरराव जाधव यांनी केले व अपिलीय प्राधिकारी श्री.आर.के.गायकवाड यांनी त्याला दुजोरा दिला. संबंधित कागदपत्रे शोधून देण्याची आपली इच्छा असून त्यासाठी एक महिन्याची मुदत मिळावी, अशी विनंती श्री.गायकवाड यांनी केली, आयोगाने ती मान्य केली.

एक महिन्यातही माहिती न मिळाल्याचे श्री.जगताप यांनी आयोगाला कळविले, दरम्यान संबंधित कागदपत्रांचा शोध घेण्यात येत असून आणखी एक महिन्याची मुदत मिळावी, अशी विनंती श्री.गायकवाड यांनी दि.१८.६.२००८ च्या पत्राने आयोगाला केली. कमाल जमीन धारणा कायद्याखालील प्रकरण ८५०-जेए ही संचिका मे-२००६ मध्ये हरवली आहे, ती देणे जाणीवपूर्वक टाळण्यात येत आहे, असे प्रतिपादन श्री.जगताप यांनी दि.२१.६.२००८ रोजी आयोगाला पाठविलेल्या निवेदनात केले. संबंधित कागदपत्रे शोधण्याबाबत आपण स्वत: प्रयत्नशील असून कागदपत्रे न मिळाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख कायदा २००५ अन्वये संबंधित कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया आपण करु, असे निवेदन श्री.गायकवाड यांनी आयोगापुढील सुनावणीत स्वयंस्फूर्तीने केले होते. आयोगाने कागदपत्रे शोधण्यासाठी आणखी एक महिन्याची मुदत न देता १५ दिवसाची मुदत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना दिली, तसेच या मुदतीत श्री.जगताप यांना आवश्यक माहिती दिली गेली नाही तर सदर कागदपत्रांच्या जतनास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यासह योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश दि.२४.६.२००८ च्या पत्रान्वये अप्पर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह श्री.गायकवाड यांना दिले. त्यानंतर, श्री.जगताप यांना अनेक वेळा माहिती घेण्यासाठी येण्याची विनंती करुनही ते आले नसल्याचे व तसे त्यांना दि.२१.७.२००८ रोजी पत्राद्वारे कळविल्याचे श्री.गायकवाड यानी दि.२१.७.२००८ रोजी संबंधित पत्राच्या प्रतीसह आयोगाला अवगत केले. मात्र श्री.जगताप यांनी राज्य माहिती आयोगासमोरच संबंधित माहिती आपण स्वीकारु, असे श्री.गायकवाड याना दि.२३.७.२००८ रोजी कळवून त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यास नकार दिला. श्री.जगताप यांनी या संदर्भात बराच पत्रव्यवहार केला आहे. श्री.गायकवाड यांच्या कार्यालयात उपस्थित राहून काही साध्य होत नसल्याचे व माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचे त्यांनी सातत्याने नमूद केले आहे. श्री.जगताप माहिती नेण्यासाठी येत नसल्याचे श्री.गायकवाड यांचे म्हणणे लक्षात घेता नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवून देण्याचे निर्देश आयोगाने दि.२९.८.२००८ रोजी श्री.गायकवाड यांना दिले. तसेच हजर न राहण्याबाबतची

सद्यस्थिती आयोगास सादर करावी असे कळविले. दि.२२.९.२००८ रोजी अप्पर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समूह यांनी पाठविलेला महत्त्वाचा बंद लिफाफा डाक नोंदणी पोच पावतीने मिळाला, परंतु आपण तो न उघडता अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाकडील प्रतिनिधी व अपीलकर्ता याच्यासमोर आयोगाच्या कार्यालयात उघडून सत्यता पडताळण्यात यावी, असे पत्र श्री.जगताप यांनी दि.२५.९.२००८ रेजी आयोगाला पाठविले. श्री.जगताप पत्रव्यवहारात अशा अटी नमूद करीत आले असून अशा प्रकारची कार्यपध्दती मान्य करता येणार नाही. आपल्या मागणीनुसार माहिती मिळाली की नाही हे माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्याने स्वतःच तपासणे आवश्यक आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१.१२.२००८**

डिसेंबर-२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-१

श्री. अच्यूत कृष्ण जातेगांवकर
मु.पो.जातेगाव खुर्द, ता. शिरूर, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार, शिरूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
तहसील कार्यालय, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०८ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.११.२००७ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१.२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.३.२००८ |

५ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

क्र. कु.का./कावि/७/०७ शिरूर दि. ९.२.२००७ प्रमाणे पाठविलेल्या माहिती मधील क्र.एक मधील प्रतिवेदनाची प्रत अढळ होत नसल्याने संबंधितांवर कारवाइ करण्यास कोणत्या अडचणी आहेत व तद्अनुषंगिक कारवाईचे दोन मुद्दे

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अच्युत कृष्ण जातेगांवकर यांचे अपिलाची तपासणी केली असता मूळ माहिती अर्जामध्ये कारवाईबाबतची मागणी करण्यात आलेली आहे. अशा प्रकारची कारवाईची व भाष्याच्या स्वरूपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र संबंधितांवरील कारवाईबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित विषयातील कारवाईबाबतच्या सद्यस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास देऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. २९.११.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ~~१४५१~~ १८५१ / पुणे / २००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | ब्रिगेडीअर असिल सिंग (निवृत्त)<br>फ्लॅट नं.३, अविनाश अपार्टमेंट,<br>प्लॉट नं.१५, स.नं.६३,<br>साळुंके विहार रोड, कोंढवा खु., पुणे-४११०४८ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर उपअभियंता, विकास योजना विभाग,<br>पुणे महानगरपालिका | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | नगर अभियंता, विकास योजना विभाग,<br>पुणे महानगरपालिका | हजर |
| ५ | सुनावणीची तारीख | २८.८.२००८ | |

## <u>विवेचन</u>

तळमजल्यावर खुल्या जागेमध्ये सदनिकाधारकास गार्डन करता येते का व तसेच झाडे लावता येतात का, या अनुषंगाने अपीलकर्ता ब्रिगेडीअर असिल सिंग(निवृत्त) यांनी दि.३०.८.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, पुणे महानगरपालिका यांच्याकडे माहिती मागितली होती.

महानगरपालिकेला झाडे लावणे अनिवार्य केलेले असून न्यायालयाच्या आदेशान्वये त्याबाबतची पूर्तता करण्यात येत असल्याचे व याबाबत अपीलकर्त्याला माहिती देण्यात आली होती, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. कार्यवाहीचा अहवाल लेखी स्वरुपात अपीलकर्त्याला द्यावा व त्याची प्रत आयोगास सादर करावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार माहिती देण्यात आली, परंतु अपीलकर्त्याची मूळ मागणी आपल्या

सदनिकेसमोरील वृक्षतोडीसंबंधी महानगरपालिकेने कार्यवाही करावी अशी आहे, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.५.९.२००८ च्या अहवालात नमूद केले आहे. ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.११.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप सखाराम माने
एस.टी. स्टॅण्ड समोर, इस्लामपूर
वाळवा, ता. वाळवा, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथाअधिक्षक अभियंता
ताराबाई पार्क, कोल्हापूर सिंचन भवन ,कोल्हापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
वारणा कालवे विभाग, क्र.१ पेठ वसाहत, इस्लामपूर
ता वाळवा , जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८,२५७,२५८ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४-८-२००६,१-११-२००६,५-१२-२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०-१-२००७ २९-८-२००६,१०-१-२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५-९-२००६,५-२-२००७, |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३-१०-२००७,२१-१-२००७ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | वारणा कालवे विभाग क्र.१ मध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांची, त्यांच्याबाबत एकूण ०४ मुद्दयांची माहिती,तसेच श्री महादेव धोंडिबा रेडेकर,लोटीव, ता. शिराळा, जि.सांगली यांच्या घरांच्या रक्कमेबाबत एकूण ९ मुद्दयांची माहिती मागितली होती. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दिलीप सखाराम माने यांनी आयोगाकडे केलेल्या तीन अपिलांमध्ये अनुक्रमे वारणा कालवा विभाग क्र.१ मध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांची माहिती, तसेच श्री महादेव धोंडिबा रेडेकर यांच्या घराच्या रक्कमेबाबत माहिती मागितली होती.

प्राप्त माहितीने अपीलकर्त्याचे समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दरम्यानच्या काळात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती बरोबर असल्याचे पटवून दिल्यामुळे आपली कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे अपिलकर्त्याने दि. १६/७/२००८ व २५/८/२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १४.११.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रावसाहेब बबन डोमे
मु.पो.भांडगाव, ता.दौंड, जि.पुणे ४१२२१४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
शिवराम बापू कुदळे माध्यमिक विद्यालय, बोरीऐंदी, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९९ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.पी.एम.परब

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.७.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जून २००० ते डिसेंबर २००५ पर्यंतचे सेवक संच निश्चिती प्रस्ताव फाईल, शालेय जावक रजिस्टर, शिक्षक हजेरी मस्टर, श्री.रासकर, श्री.महाजन व कु.नेवसे यांची वैयक्तिक मान्यता प्रस्ताव व मान्यताप्रत, सन २००१-२००२ व सन २००२-२००३ मधील इयत्ता नववीचे जून व एप्रिल या दोन महिन्यांचे विद्यार्थी हजेरीपत्रक, उच्च न्यायालयात ॲड.पित्रे यांनी दाखल केलेले कॅव्हेट या सर्वांच्या साक्षांकित प्रती. |

## विवेचन

संपूर्ण शुल्क भरुनसुध्दा आपल्याला माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता श्री.रावसाहेब बबन डोमे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१८.३.२००६ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. परंतु तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे दि.२१.५.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.डोमे हे शिवराम बापू कुदळे माध्यमिक विद्यालय या शाळेतच उपशिक्षक म्हणून सेवेत आहेत. सेवक संच निश्चितीबरोबरच अन्य काही शिक्षकांबाबतची माहितीही त्यांनी मागितली होती. पूर्ण माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे दोन अपिले केली, परंतु अपिलांवर विहित मुद्रांक शुल्क नसल्यामुळे त्यांनी फेरअपील करण्यास सांगण्यात आले त्याची सुनावणी घेऊन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे यांनी माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिवराम बापू कुदळे माध्यमिक विद्यालय, बोरीऐंदी, ता.दौंड, जि.पुणे यांना दिले व माहिती न मिळाल्यास अपीलकर्त्याने आपल्या कार्यालयास कळवावे, असे नमूद केले. श्री.डोमे यांना वेळोवेळी माहिती दिली परंतु शिक्षक उपस्थिती पत्रकासारखी काही माहिती संस्थेकडे असल्यामुळे ती मिळवून देण्यास विलंब झाला. मात्र प्रत्येक वेळी श्री.जगताप यांनी वादविवाद घालून माहिती घेतली नाही. त्यामुळे रजिस्टर पोस्टाने माहिती पाठविली. तीही त्यांनी नाकारली, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद

प्रपत्रात नमूद केले आहे. श्री.डोमे व श्री.रासकर यांच्यामध्ये वाद असून त्यासाठी माहितीच्या अधिकारात तांत्रिक मुद्दयांचा वापर केला जात आहे. श्री.डोमे यांनी स्वत: दाखल केलेल्या कॅव्हेटची कागदपत्रे मुख्याधिकाऱ्यांकडे मागितली आहेत. यावरुन माहिती मागणीमागील भूमिका दिसून येते, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात लेखी व आयोगापुढील सुनावणीत तोंडी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व अपीलकर्त्याचे निवेदन यांचा विचार करता व्यक्तिगत वादात माहितीच्या अधिकाराचा वापर केला जात आहे, असे दिसते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या उद्दिष्टांशी ते सुसंगत नाही. स्वत: दाखल केलेल्या कॅव्हेटची कागदपत्रे जन माहिती अधिकाऱ्याकडे मागणे ही कृती योग्य नाही.

दिलेली माहिती मूळ अर्जानुसार आहे की नाही, हे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी तपासावे व कोणतीही माहिती द्यावयाची राहिली असल्यास त्वरित देण्याची व्यवस्था करावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिले होते. त्याची पूर्तता करुन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.पी.एम.परब यांनी अहवाल आयोगाला सादर करावयाचा आहे.

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार पूर्तता अहवाल दि.१०.१२.२००८ पर्यंत अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे यांनी आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२८.११.२००८**